मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ ०९ /२०१५–२०१६

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, गृहविज्ञान, नृत्य, शिक्षणशास्त्र आणि सामाजिक कार्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापक तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वयोमर्यादा वाढीबाबत आयोजित करण्यात येणा–या कामकाज आढावा बैठकीबाबत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे – १, यांनी त्यांचे पत्र क्रमांक युएनआय/सेनिवा/नावि/विशि–१/९६५ दिनांक ३० जानेवारी, २०१५ अन्वये विद्यापीठास निर्देश दिलेले आहेत की, यापुढे विद्यापीठामार्फत आयोजित करण्यात येणा–या कामकाज आढावा समितीच्या बैठका वर्षातून केवळ तीन वेळा फेब्रुवारी, जुन व ऑक्टोबर या महिन्यात घेण्यात याव्यात व त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, गृहविज्ञान, नृत्य, शिक्षणशास्त्र आणि सामाजिक कार्य महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना याद्वारे कळविण्यात येते की, सेवानिवृत्तीनंतर वयोमर्यादेत वाढ करण्याकरीता विद्यापीठामार्फत यापुढे वर्षातून केवळ तीन वेळा फेब्रुवारी, जुन व ऑक्टोबर या महिन्यात कामकाज आढावा समितीच्या बैठका विद्यापीठात घेण्यात येतील. त्यानुसार सर्व अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांनी त्यांचे पुढील सहा महिन्यात सेवानिवृत्त होणारे प्राचार्य/अध्यापक यांचे वयोवाढीचे परिपूर्ण प्रस्ताव वेळेत विद्यापीठास सादर करावेत, जेणेकरून पुढील कार्यवाही सर्व स्तरांवर वेळेत करणे शक्य होईल. सदर कालमर्यादेचे तंतोतंत पालन संबंधितांनी करावे ही विनंती. अन्यथा सेवानिवृत्तीच्या सहा महिने आधी संबंधित प्राचार्य/अध्यापक यांचे प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त न झाल्याने होणा–या विलंबास सर्वस्वी संबंधित अध्यक्ष/सचिव/प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– 9/4/2015

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, गृहविज्ञान, नृत्य, शिक्षणशास्त्र आणि सामाजिक कार्य, महाविद्यालयाचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
२. मा. श्री वि.मा. पाटील, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
३. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे — १.
४. मा. सह संचालक, महापालिका मार्ग, मुंबई विभाग, मुंबई — ४०० ००१.
५. मा. प्र.विभागीय सहसंचालक, शासकीय अध्यापक महाविद्यालय, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.
६. दि जनरल सेक्रेटरी, बॉम्बे युनिवर्सिटी अॅन्ड कॉलेज टिचर्स युनियन, मुंबई विद्यापीठ क्लब हाऊस, बी रोड, चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.
७. युनिवर्सिटी ऑफ मुंबई कॉलेज प्रिन्सिपल्स असोसिएशन, ज्ञानसाधना कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, इटरनिटी मॉलच्या शेजारी, ठाणे (पश्चिम) — ४०० ६०४.
८. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
९. स्वीय सहाय्यक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
१०. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
११. स्वीय सहायक, संचालक, बीसीयुडी, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
१२. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, कलिना, सांताक्रुझ, मुंबई — ४०० ०९८.
१३. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

9/4/11

(डॉ. एम्. ए. खान)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ